भारतीय संसद

सत्यमेव जयते

# निलेश ज्ञानदेव लंके

लोकसभा सदस्य
३७ अहमदनगर दक्षिण
महाराष्ट्र

जा.क्र.५९३७/खा.का/नगर/२०२५ दि. १३/०१/२०२४

प्रति,
मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद,
अहिल्यानगर.

विषय :- खालील कामांना अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचे वस्तीचा विकास करणे कामांना DPC सन २०२५-२०२६ जिल्हा नियोजन अंतर्गत मंजुरी देणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये माझ्या अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील खालील दलित वस्ती अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करणे कामांबावत स्थानिक नागरीकांच्या मागणी नुसार सुचविण्यात आलेल्या कामांना मंजुरी देण्यात यावी.

| अ.क्र. | ग्रामपंचायत नाव | वस्तीचे नाव | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | निंबळक ता. नगर | गौतम नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०९.०० लक्ष |
| २ | कामरगाव ता. नगर | १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर | विज पुरवठा करणे | ०३.०० लक्ष |
| | | २) रोहिदास नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०५.०० लक्ष |
| ३ | नांदगाव ता. नगर | १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर - २ | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० लक्ष |
| | | २) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर | बंदिस्त गटार | ०३.०० लक्ष |
| | | ३) जाधववस्ती | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०५.०० लक्ष |
| | | ४) सम्राट अशोक नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० लक्ष |
| ४ | भातोडी ता. नगर | १) महात्माफुले नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०४.०० लक्ष |
| | | २) रमाई आंबेडकर नगर | अ) पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०६.०० लक्ष |
| | | ३) नवबौद्ध नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०४.०० लक्ष |
| ५ | माथणी वाळेवाडी ता. नगर | जोगेवाडी | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ११.०० लक्ष |
| ६ | भोयरेपठार ता. नगर | इंदिरानगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०६.०० लक्ष |
| ७ | देहरे ता. नगर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती | विज पुरवठा करणे | १३.०० लक्ष |
| ८ | आढळगाव ता. श्रीगोंदा | १) संत रोहिदास नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०३.०० लक्ष |
| | | २) सावित्रा नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०२.०० लक्ष |
| | | ३) रमाईनगर | अ) पेव्हिंग ब्लॉक बसविणे<br>ब) पथदिवे | ०३.०० लक्ष<br>०३.०० लक्ष |

संपर्क कार्यालय : न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी,पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com

Scanned with CamScan

भारतीय संसद

# निलेश ज्ञानदेव लंके

लोकसभा सदस्य
३७ अहमदनगर दक्षिण
महाराष्ट्र



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | खांडगाव / वडघुल ता. श्रीगोंदा | केदारे वस्ती १ तुपविहारे वस्ती | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०५.०० लक्ष |
| १० | पारगाव सुद्रिक ता. श्रीगोंदा | १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १२.०० लक्ष |
| | | २) नालंदा नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०२.०० लक्ष |
| | | ३) थोरात वस्ती | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०४.०० लक्ष |
| ११ | पिंपळगाव पिसा ता. श्रीगोंदा | इंदिरा नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०८.०० लक्ष |
| १२ | येवती ता. श्रीगोंदा | डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०४.०० लक्ष |
| १३ | बोधेगाव ता. शेवगाव | १) आंबेडकर नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० लक्ष |
| | | २) आण्णाभाऊ साठे नगर | बंदिस्त गटार | ०२.०० लक्ष |
| १४ | दहिगाव ने ता. शेवगाव | १) आण्णाभाऊ साठे नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०३.०० लक्ष |
| | | २) रमाबाई आंबेडकर नगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०४.०० लक्ष |
| | | ३) राजश्री शाहू नगर खळवाडी | अ) रस्ता कॉंक्रिटीकरण करणे<br>ब) बंदिस्त गटार | ०२.०० लक्ष<br>०४.०० लक्ष |
| | | ४) कसबे वस्ती देवळाने | रस्ता खडीकरण करणे | १०.०० लक्ष |
| | | ५) कसबेवस्ती चांदगाव रोड | रस्ता खडीकरण करणे | ०४.०० लक्ष |
| १५ | गायकवाड जळगाव ता. शेवगाव | १) आण्णाभाऊ साठे नगर | अ) बंदिस्त गटार<br>ब) विज पुरवठा करणे | १०.०० लक्ष<br>०४.०० लक्ष |
| | | २) आंबेडकर नगर | अ) विज पुरवठा करणे<br>ब) बंदिस्त गटार | ०२.०० लक्ष<br>०३.०० लक्ष |
| | | ३) हिंगे वस्ती | अ) विज पुरवठा करणे<br>ब) बंदिस्त गटार | ०२.०० लक्ष<br>०३.०० लक्ष |
| | | ४) चौकवस्ती | विज पुरवठा करणे | ०२.०० लक्ष |
| १६ | खरडगाव ता. शेवगाव | रमाईनगर | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० लक्ष |
| १७ | भाळवणी ता. पारनेर | १) दत्तनगर | विज पुरवठा करणे | ०३.०० लक्ष |
| | | २) माळवाडी | विज पुरवठा करणे | ०७.०० लक्ष |
| | | ३) नगर कल्याण रोड | विज पुरवठा करणे | ०४.०० लक्ष |
| १८ | गुणोरे ता. पारनेर | आंबेडकर नगर | अ) सार्वजनिक शौचालय<br>ब) समाज मंदिर दुरुस्ती | ०४.०० लक्ष<br>०१.०० लक्ष |
| १९ | बाभुळवाडा ता. पारनेर | समतानगर | अ) रस्ता कॉंक्रिटीकरण करणे<br>ब) समाज मंदिर दुरुस्ती | ०५.०० लक्ष<br>०१.०० लक्ष |
| २० | भांडगाव ता. पारनेर | नवजीवन वस्ती | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०२.०० लक्ष |
| २१ | चोंभुत ता. पारनेर | गावठाण | विज पुरवठा करणे | ०३.०० लक्ष |

P.T.O

संपर्क कार्यालय : न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी,पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com

Scanned with CamScan

भारतीय संसद

सत्यमेव जयते

# निलेश ज्ञानदेव लंके

लोकसभा सदस्य
३७ अहमदनगर दक्षिण
महाराष्ट्र



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | शेरीकासारे ता. पारनेर | पाखरकरझाप | अ) बंदिस्त गटार<br>ब) विज पुरवठा करणे | ०४.०० लक्ष<br>०३.०० लक्ष |
| २३ | पिंपरीगवळी ता. पारनेर | गावठाण | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०३.०० लक्ष |
| २४ | नारायणगव्हाण ता. पारनेर | रमाई नगर | अ) पेव्हिंग ब्लॉक बसविणे<br>ब) विज पुरवठा करणे | ०२.०० लक्ष<br>०१.०० लक्ष |
| २५ | विरोली ता. पारनेर | कान्हुररोड मोरेवस्ती | अ) विज पुरवठा करणे<br>ब) समाज मंदिर | ०२.०० लक्ष<br>०७.०० लक्ष |
| २६ | तांदुळनेर ता. राहुरी | सोनवणे वस्ती | रस्ता खडीकरण करणे | ०३.०० लक्ष |
| २७ | पिंप्री अवघड ता. राहुरी | गावठाण | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०५.०० लक्ष |
| २८ | वावरथ ता. राहुरी | गावठाण जाधव वस्ती | समाज मंदिर दुरुस्ती | ०४.०० लक्ष |
| २९ | गुहा ता. राहुरी | जवाहरवाडी | रस्ता खडीकरण करणे | ०२.०० लक्ष |
| ३० | वरवंडी ता. राहुरी | खडकवाडी नारायणवाडी | रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ०२.०० लक्ष |
| ३१ | वांबोरी ता. राहुरी | आंबेडकरनगर - १ | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ०५.०० लक्ष |
| ३२ | वाघाचा आखाडा ता. राहुरी | वाघाचा आखाडा वस्ती | विज पुरवठा करणे | ०२.०० लक्ष |
| ३३ | कुकडवेढे | १) मकासरे वस्ती<br>२) पटेकर वस्ती | विज पुरवठा करणे<br>रस्ता खडीकरण करणे | ०३.०० लक्ष<br>०१.०० लक्ष |
| ३४ | राशिन ता. कर्जत | आंबेडकर नगर | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १०.०० लक्ष |

NILESH D. LANKE
MEMBER OF PARLIAMENT, AHILYANAGAR
सत्यमेव जयते

आपला स्नेहांकित,

(निलेश ज्ञानदेव लंके)

संपर्क कार्यालय : न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी,पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com

Scanned with CamScan

प्रशासकिय मान्यता आदेश

अनुसूचित जाती व नवबौध्द घटाकांच्या वस्तींचा विकास करणे ( दलित वस्ती सुधार योजना ) या योजनेंतर्गत सन २०२५-२६ मधील वस्तीनिहाय कामे मंजुरीस प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

## जिल्हा परिषद अहिल्यानगर
## समाज कल्याण विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र:-जिसकअ/अजानबौघववि/प्र.मा.५/ १०५ /२०२५-२६,दिनांक २४/०२/२०२६.

वाचा:- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२००८/ प्र.क्र. ५२४/ विघयो -१, दिनांक १४/११/२००८

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु- २०११/ प्र.क्र. ४४२/ अजाक, दिनांक ५ डिसेंबर, २०११

३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेपीए — २०१२ / प्र.क्र. ६८० / वित्त-९ दि.३१/१/२०१३

४. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक- निविदा-२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ दिनांक २७ मे ,२०२१.

५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-०१५/प्र.क्र.५९/ अजाक-१, दिनांक २७ मे, २०१५

६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शुध्दीपत्रक क्र.दवसु-२०१५/प्रक्र.५९/ अजाक-१/ दिनांक ८ मार्च, २०१६.

७. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०२१/प्र.क्र.७९/ अजाक दिनांक ६ ऑक्टोंबर, २०२१

८ महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : पदिदे-२०२१/ प्र.क्र. ३८/ वित्त-२ दि.०८ डिसेंबर २०२१

९ महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण - २०२१/प्र.क्र.१०९/अजाक दिनांक १६ डिसेंबर, २०२१

१० मा. आयुक्त, समाज कल्याण,पुणे यांचेकडील पत्र क्र. सकआ/मावक/अजानबौघववि/सुधारीत बृहत आराखडा/२६२५/२०२३-२४ दिनांक ०२/०८/२०२३

११ मा. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ यांचेकडील परिपत्रक क्र.बीजीटी-२०२२/प्र.क्र.८८/अर्थसंकल्प(विघयो) दि.०३/११/२०२२ अन्वये मा. पालकमंत्री महोदय यांना दिलेले अधिकार.

१२ या कार्यालयाचे आदेश क्र.जिसकअ/अजावनबौघववि/आराखडा/२०२३-२४ ते २०२७-२८/२१८४/ २०२३ दिनांक ५/१२/२०२३.

१३ मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नाशिक विभाग, नाशिक पत्र क्र. प्राऊसकना /अजावनबौघववि/बृहत आराखडा/अ.नगर/२०२३-२४/५१४४ दिनांक ५/१२/२०२३.

१४ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.सआ/अन/अजाउयो / अर्थ संकल्प /२०२५-२६/१४५८ दि.८/०४/२०२५.

१५ गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडील प्राप्त प्रस्ताव.

१६ मा. समाजकल्याण सल्लागार समिती सभा दिनांक ०५/०२/२०२६.

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये पाणी पुरवठा, मलनिस्सारण, विजपुरवठा, गटार बांधकाम, अंतर्गत रस्ते, पोच रस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा व समाज मंदिर बांधकाम इत्यादी मुलभूत सोई-सुविधांची कामे केली जातात.

उपोदघातातील अनुक्रमांक २ मधील शासन निर्णयान्वये परिशिष्ट-अ नुसार सदर योजनेअंतर्गत निधी वाटपाचा प्राधान्यक्रम तसेच घ्यावयाची कामे या बाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत.

उपोदघातातील अनुक्रमांक ६ मधील शासन शुध्दीपत्रकानुसार शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत कामे मंजुर करण्याबाबतचे आदेशामध्ये दुरुस्ती करुन सदरची कामे जिल्हा परिषद समाज कल्याण समितीच्या मान्यतेने मंजुर करावीत अशी दुरुस्ती केली आहे. तथापी दि.२० मार्च २०२२ रोजी राज्यातील जिल्हा परिषदांची व २८४ पंचायत समितींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक दि.१४/०३/२०२२ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आलेली आहे.

उपरोक्त वस्तूंस्थितीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.११ अन्वये सन २०२५.२६ साठी मा. पालकमंत्री, अहिल्यानगर यांनी सहमती दिलेल्या अहिल्यानगर जिल्यातील रक्कम रुपये **७,५८,२५,०००/- अक्षरी रुपये (अक्षरी रक्कम रुपये सात कोटी अठठावन्न लक्ष पंचवीस हजार मात्र)** च्या निधी मंजुरीस तसेच <u>परिशिष्ट-"ब"</u> मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करणेत येत आहे.

सदर मंजूर कामांसाठी करावयाचा खर्च सदर योजनेंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली सन २०२५.२६ या आर्थिक वर्षात जिल्हा निधीत उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागवावा .

| शासकीय लेखाशिर्ष | जि.प.लेखाशिर्ष |
|---|---|
| २२२५-अनु.जाती, अनु.जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१, अनु जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च, पंचवार्षीक योजनांतर्गत योजना (०६)(०२), महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने- दलित वस्त्यांची सुधारणा (२२२५-E५५२)<br>३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) | १४- समाज कल्याण<br>अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजना<br>**योजनांतर्गत**<br>सांकेतांक क्र १४१०८ |

(देविदास कोकाटे)
**जिल्हा समाजकल्याण अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

(विजय मुळीक)
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित ....

१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२.कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (उत्तर/दक्षिण), जिल्हा परिषद अहिल्यानगर
३.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
४.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, --------- (सर्व), जिल्हा- अहिल्यानगर
५.सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत ------------- ता.---------------

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.............

१. मा आयुक्त, समाज कल्याण, पूणे-१
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नाशिक विभाग, नाशिक
४. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,डॉ.बा.आंबेडकर समाजिक न्याय भवन,सावेडी रोड अहिल्यानगर

# जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत सन 2025/2026 या आर्थिक वर्षात प्रशासकिय मंजुरी देणे**

**प्रशासकिय मंजुरी आदेश क्र. जिसकअ/अजावनबौघववि/प्र.मा.क्र.5/९०५ /2025-26 दि.२८/02/2026**

| अ. नं. | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | वस्तीचे नाव | वस्तीचा सांकेतांक (जि-ता-व) | 2023-24 मध्ये वस्तीची घोषित केलेली प्रत्यक्ष लोक संख्या | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | पारनेर | भांडगाव | नवजीवन वस्ती | 11-11-013 | 48 | कॉंक्रिट रस्ता | 2.00 |
| 2 | पारनेर | भाळवणी | दत्तनगर | 11-11-022 | 68 | विज पुरवठा | 3.00 |
| 3 | पारनेर | गुणोरे | आंबेडकर नगर | 11-11-043 | 73 | सार्वजनिक शौचालय | 4.00 |
|  | पारनेर | गुणोरे | आंबेडकर नगर | 11-11-043 | 73 | समाजमंदिर दुरुस्ती | 1.00 |
| 4 | पारनेर | बाभुळवाडा | समतानगर | 11-11-056 | 79 | कॉंक्रिट रस्ता | 5.00 |
|  | पारनेर | बाभुळवाडा | समतानगर | 11-11-056 | 79 | समाज मंदिर दुरुस्ती | 1.00 |
| 5 | पारनेर | चोंभुत | गौतमनगर | 11-11-101 | 205 | विज पुरवठा | 9.00 |
| 6 | पारनेर | निघोज | क्रांतीवीर नगर लहुजी वस्ताद साळवे | 11-11-216 | 61 | कॉंक्रिट रस्ता | 6.00 |
| 7 | पारनेर | निघोज | आण्णा भाऊसाठे नगर | 11-11-213 | 101 | विज पुरवठा | 6.00 |
| 8 | पारनेर | चोंभुत | गावठाण | 11-11-100 | 99 | विज पुरवठा | 3.00 |
| 9 | पारनेर | माळकुप | गावठाण | 11-11-130 | 38 | पेव्हिंगब्लॉक बसविणे | 6.00 |
| 10 | पारनेर | अळकुटी | गावठाण | 11-11-165 | 146 | समाज मंदिर दुरुस्ती | 1.00 |
| 11 | पारनेर | अळकुटी | श्री. संत रोहिदास नगर | 11-11-166 | 105 | कॉंक्रिट रस्ता | 8.00 |
| 12 | पारनेर | अळकुटी | यशवंत नगर | 11-11-169 | 56 | कॉंक्रिट रस्ता | 8.00 |
| 13 | पारनेर | देसवडे | खाडेवस्ती क्र.2 | 11-11-163 | 186 | पोहोच रस्ता | 1.00 |
|  | पारनेर | देसवडे | खाडेवस्ती क्र.2 | 11-11-163 | 186 | समाजमंदिर बांधकाम | 7.00 |
| 14 | पारनेर | देसवडे | खाडेवस्ती क्र.3 | 11-11-164 | 57 | कॉंक्रिट रस्ता | 2.00 |
|  | पारनेर | देसवडे | खाडेवस्ती क्र.3 | 11-11-164 | 57 | पाणी पुरवठा | 2.00 |
| 15 | पारनेर | कुरुंद | गावठाण | 11-11-061 | 368 | कॉंक्रिट रस्ता | 10.00 |
|  | पारनेर | कुरुंद | गावठाण | 11-11-061 | 368 | बंदिस्त गटार | 10.00 |
| 16 | पारनेर | पिंपरीगवळी | गावठाण | 11-11-221 | 55 | पेव्हिंग ब्लॉक बसविणे | 3.00 |
| 17 | पारनेर | नारायणगव्हाण | रमाई नगर | 11-11-227 | 127 | पेव्हिंग ब्लॉक | 2.00 |
| 18 | पारनेर | विरोली | कान्हुररोड मोरेवस्ती | 11-11-246 | 77 | विज पुरवठा | 2.00 |
| 11 | पारनेर | वस्ती संख्या - 18 | कामे संख्या - 23 |  | 2712 | पारनेर | 102.00 |

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

# परिशिष्ट ब

जिल्हा परिषद आदेश क्र:जिसकअ/अजावनबौघववि/प्र.मा.५/९०५ /२०२५-२६, दिनांक - २४/०२/२०२६

**सोबतचे परिशिष्ट "ब"**

**अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे**

अटी व शर्ती :-

१. जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयाकडून प्रशासकीय मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा कामांची पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र नोंदवहीत नोंद ठेवावी.

२. प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामास सुरुवात करण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. तांत्रिक मान्यता देताना सक्षम प्राधिका-याने सदरचे काम ग्रामपंचायतीने सुचविलेल्या अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतच असल्याची खात्री करावी. याबाबत काही शंका/संशय असल्यास संबंधित गटविकास अधिका-यांचे अभिप्राय घ्यावेत.

३. सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर उपोदघातातील सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.४ मधील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत अंतर्गत करावयाच्या रुपये १० लक्ष (सर्व कर अंतर्भुत करुन ) रकमेवरील कामांकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन कामे करावीत. असे न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, उपअभियंता व गट विकास अधिकारी यांच्यावर राहील.

४. या योजनेंतर्गत काम मंजुरीच्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशानंतर सबंधीत गटविकास अधिकारी यांनी सदर कामास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घ्यावी.

५. सदर निधी गट विकास अधिकारी तसेच ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यात ठेवावा. निधी प्राप्त झाल्यानंतरच कामास सुरुवात करावी.

६. ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांनी काम सुरु करण्यापूर्वी संबंधित जागेचे छायाचित्र घ्यावे, जेणेकरुन काम पूर्ण झाल्यानंतर परिस्थीतीत झालेला बदल लक्षात येईल.

७. सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय दिनांक १९ जुन २०१७ मध्ये दिलेल्या सुचनानुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणारी कामे ही त्याच वस्तीत घेण्यात यावीत. सदर कामे बिगर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीत घेण्यात येऊ नयेत. तसेच सदर योजनेचा लाभ केवळ अनुसुचित जाती आणि नवबौध्द घटकांनाच होईल याबाबत दक्षता घ्यावी.

८. सदर योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी मंजूर कामांशिवाय इतरत्र वळती करु नये. असे काम सदर वस्तीशिवाय इतर ठिकाणी झाल्यास किंवा मंजूर निधी इतरत्र वळती केल्यास त्याची जबाबदारी संबंधित ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांचेकडून कामासाठी झालेला संपूर्ण खर्च त्यांच्याकडुन वसुल करण्यात येईल. तसेच त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. अशा घटनांसाठी नजिकचे नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधित सहा.गट विकास अधिकारी यांनाही जबाबदार धरण्यात येईल.

९. सदर योजनेंतर्गत मंजूर झालेले काम मंजूरीच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सदर काम संबंधित ग्रामसेवकाच्या सहाय्याने मुदतीत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांची राहील. काम अपूर्ण राहिल्यास त्या ग्रामपंचायतीस या योजनेंतर्गत पुढील दोन वर्षाकरीता निधी मंजूर केला जाणार नाही.

१०. काम पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष मंजूर निधीपेक्षा जास्त निधीची गरज पडल्यास असा अतिरीक्त निधी समाजकल्याण विभागाकडून दिला जाणार नाही.

११. सदर आदेशान्वये मंजूर केलेले काम मंजूर अंदाजपत्रकानुसार व रेखांकनाप्रमाणेच करावे. सदर कामाचा दर्जा चांगला असणे आवश्यक आहे. सदर दर्जा चांगला राखण्याची जबाबदारी संबंधित ग्रामसेवक व प्रामुख्याने कामावर देखरेख करणा-या सहाय्यक गटविकास अधिकारी व अभियंता यांची राहील.

१२. काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठिकाणी कामाचा सविस्तर तपशील दर्शविणारी कोनशिला/नामफलक बसवावा. सदर कोनशिलेवर/नामफलकावर योजनेचे नांव, कामाचे नांव, काम

मंजूरीचे वर्ष, कामासाठी मंजूर निधी, काम पूर्ण केल्याचा दिनांक इत्यादी तपशील ठळक अक्षरात नमुद करावा.

१३. सदर योजनेंतर्गत मंजूर कामपुर्ण झालेनंतर ग्रामपंचायतीला हस्तातंरीत करावे. सदर कामाची नोंद ग्रामपंचायतीचे मालमत्ता नोंदवही नमुना नंबर ३० / नमुना नंबर ८ यामध्ये घेण्यात यावी. त्यानंतर त्या संबंधित ग्रामपंचायतीची मालकी राहील. मंजूर काम पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहील. त्यासाठी कोणताही स्वतंत्र निधी दिला जाणार नाही.

१४. सदर योजनेंतर्गत मंजूर कामावर संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी व अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता,जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

१५. सदर कामाची कोणत्याही टप्प्यावर तपासणी/पाहणी करण्याचे अधिकार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस राहतील.

१६. सदर कामासाठी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा कमी खर्चात काम पूर्ण झाल्यास शिल्लक रक्कम तात्काळ शासनखाती जमा करण्याची जबाबदारी संबंधित गटविकास अधिकारी यांची राहील.

१७. सदर आदेशान्वये मंजूर केलेले काम अपवादात्मक परीस्थितीत काही तांत्रिक अथवा न्यायालयीन कारणास्तव रदद करणे आवश्यक असल्यास तसा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे पाठवावा. त्यांच्या मंजूरीशिवाय असे काम ग्रामपंचायतीस अथवा गटविकास अधिकारी यांना परस्पर रदद करता येणार नाही. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काम रदद केल्याचे आदेश दिल्यापासून १ महिन्याच्या आत सदर कामासाठी मंजूर केलेली संपूर्ण रक्कम शासनखाती जमा करावी लागेल.

१८. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्राक क्रमांक : पदिदे-२०२१/प्र.क्र.३८/वित्त-२ दि.०८ डिसेंबर २०२१ नुसार ग्रामपंचायतीच्या हददीतील रस्त्यावरील दिव्यांच्या वीज वापरात बचत करण्यासाठी दिवे एलईडी चे वापरण्यात यावेत. सदर योजनेंतर्गत मंजुर केलेल्या एलईडी दिव्यांच्या बाबतीत दिव्याच्या खांबाची उंची किमान ३ मिटर असावी.

१९. समाजमंदिराच्या कामाबाबत जातीय ऐक्याच्या दृष्टीने संपुर्ण गावासाठी एकच समाजमंदिर असावे व ते सर्व अनुसुचित जाती व नवबौध्द जातीच्या सर्व वस्त्यांना लाभ घेता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे तथापी या आदेशान्वये मंजुर करण्यात येत असलेल्या समाजमंदिराच्या कामाबाबत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी यापुर्वी सदर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात घोषीत केलेल्या वस्तीमध्ये यापुर्वी समाजमंदिराचे काम झाले असल्यास या आदेशान्वये मंजुर करण्यात येत असलेले काम रदद करुन आराखडयातील दुसरे काम मंजुर करुन घ्यावे.

२०. या आदेशान्वये मंजुर केलेला निधी चुकीच्या माहितीवर/चुकीच्या पदधतीने निवड झाल्याचे निदर्शनास आल्यास गट विकास अधिकारी यांनी तातडीने सदरची बाब जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दयावी व सदरचे आदेशामध्ये बदल/रदद करुन घ्यावे. असे चुकीचे काम सुरु केल्यास गटविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना जबाबदार धरण्यात येईल.

(देविदास कोकाटे)
जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

(विजय मुळीक)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर